International Journal of Research in Social Sciences
Vol. 9 Issue 3, March 2019,
ISSN: 2249-2496 Impact Factor: 7.081
Journal Homepage: http://www.ijmra.us, Email: editorijmie@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal - Included in the International Serial Directories Indexed & Listed at: Ulrich's Periodicals Directory ©, U.S.A., Open J-Gate as well as in Cabell's Directories of Publishing Opportunities, U.S.A

# 'डागमळा' भूमिगत स्वातंत्र्य चळवळीतील एक गुप्त केंद्रस्थान : एक ऐतिहासिक विश्लेषण

**उमेश गणेशराव जांभोरे**
**सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,**
**यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर**

**प्रस्तावनाः**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील भूमिगत चळवळीचे योगदान विचारात घेता, तिची पार्श्वभूमी प्रदीर्घ आणि संघर्षपूर्ण असल्याचे स्पष्ट होते. इंग्रजांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून व्यापाराच्या निमित्ताने भारतात प्रवेश केला. अल्पावधीतच त्यांनी इतर युरोपीय व्यापाऱ्यांना मागे टाकून स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित केले. प्लासी (१७५७) आणि बक्सर (१७६४) या लढायांमुळे त्यांनी बंगालप्रांतात राजकीय सत्ता मिळवली आणि त्या जोरावर भारतात वसाहतवादी साम्राज्य उभारण्यास सुरुवात केली. याच सुमारास इंग्रजांनी दुहेरी प्रशासनव्यवस्था, तैनाती फौज पद्धती, आणि विलीनीकरणाचे धोरण अवलंबून देशी संस्थानांवर अधिपत्य गाजवले. महसूलव्यवस्थेच्या नावाखाली कायमधारा, रयतवारी आणि महालवारी या प्रणाली लागू करून शेतकऱ्यांचे शोषण केले. याचबरोबर इंग्रजांच्या व्यापारी धोरणांमुळे पारंपरिक उद्योगधंदे, कारागिरी, लघुउद्योग लयाला गेले आणि भारतातील आर्थिक रचना कोसळली.

इंग्रजांच्या वसाहतवादी अन्यायाविरुद्ध आदिवासी व जनजाती समाजांनी प्रतिकार केला. रामोशी, भिल्ल, कोळी यांसारख्या समाजघटकांनी सशस्त्र उठाव केले, परंतु इंग्रजांनी कूटनीती व दडपशाहीने हे उठाव मोडीत काढले. पुढे १८५७ चा उठाव हा स्वातंत्र्यासाठीचा प्रथम व्यापक सशस्त्र संघर्ष ठरला, जरी त्याला एकसंध नेतृत्वाचा अभाव होता. या उठावानंतर १८५८ मध्ये ब्रिटिश सरकारने राणीचा जाहीरनामा पारित करून ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता संपुष्टात आणली. परिणामी देशाची सत्ता ब्रिटीश पार्लमेंटच्या हाती गेली.

स्वातंत्र्यासाठी जुने नेतृत्व, जुन्या प्रेरणा यांचा उपयोग होणार नाही, याची लोकांना जाणीव झाली. परिणामी पाश्चात्य शिक्षणाने सुसंस्कृत झालेल्या मध्यमवर्गीय नेतृत्ववर्गाने नव्या प्रकारच्या संघटनांचे निर्माण केले. दादाभाई नौरोजी, महादेव गोविंद रानडे, सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांसारख्या नेत्यांनी राष्ट्रीय जागृतीसाठी कार्य केले. यातूनच अखिल भारतीय स्वरूपाच्या संघटनेची गरज ओळखून १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ची स्थापना झाली.

**१८८५ ते १९०५ या कालखंडात काँग्रेसवर मवाळ नेत्यांचे वर्चस्व राहिले. त्यांनी ब्रिटिश सत्तेवर विश्वास ठेवत सनदशीर मार्गाने मागण्या मांडल्या. मात्र, सातत्याने होणाऱ्या दुर्लक्षामुळे जहाल विचारसरणी उदयाला आली. १९०५ नंतर तिळक, लाजपत राय, बिपिनचंद्र पाल यांसारख्या नेत्यांनी आत्मनिर्भरतेचा आणि असहकारतेचा मार्ग स्वीकारला. पुढे १९२० नंतर महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली चळवळीने अहिंसात्मक आणि सविनय कायदेभंगाचे स्वरूप धारण केले. १९४२ साली 'चले जाव' चळवळीदरम्यान गांधीजी आणि प्रमुख नेत्यांना अटक झाल्यानंतर जनतेने चळवळीचे नेतृत्व स्वतःकडे घेतले. यातूनच स्वातंत्र्याची चळवळ अखंडपणे चालू राहावी या हेतूने अनेक ठिकाणी ब्रिटीश सत्तेविरुद्ध भूमिगत स्वरूपात लढे उभारले गेले. यातूनच भूमिगत चळवळींचा विस्तार झाला. भूमिगत चळवळीतील क्रांतिकारकांनी ब्रिटीश सत्तेची केंद्र उध्वस्त करून ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. परिणामी ब्रिटीश सरकारने दडपशाहीचा अवलंब करीत अटकसत्र सुरु केले. या पार्श्वभूमीवर भूमिगत चळवळीतील क्रांतिकारकांनी गुप्तस्थळी आश्रय घेवून चळवळ तेवत ठवली. त्यादृष्टीने भूमिगत स्वातंत्र्य चळवळीतील एक गुप्त केंद्रस्थान म्हणून डाग मळ्याची भूमिका महत्त्वाची व निर्णायक ठरली.**

**प्रस्तुतच्या शोधनिबंधातून डागमळ्याचे भूमिगत स्वातंत्र्य चळवळीतील एक गुप्त केंद्रस्थान म्हणून ऐतिहासिक विश्लेषण करणे तसेच भारतीय स्वातंत्र्य चळवळीत त्याचे स्थान अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.**

**उद्दिष्टेः**

१. **डाग मळ्याचे भूमिगत स्वातंत्र्य चळवळीतील एक गुप्त केंद्रस्थान म्हणून एक ऐतिहासिक विश्लेषण करणे.**
२. **डाग मळ्याचे भूमिगत चळवळीतील क्रांतिकारकांचे आश्रयस्थान म्हणून महत्व अधोरेखित करणे.**
३. **डाग मळ्यामध्ये आश्रयास असलेले क्रांतीकारक व त्याच्या क्रांतीकार्य प्रकाश झोतात आणणे.**
४. **डाग मळ्याच्या रूपाने क्रांतीकारकांचा आश्रयदाता व सहकारी म्हणून तात्यासाहेब कोरे यांच्या योगदानाचा शोध घेणे.**
५. **स्वातंत्र्य चळवळीच्या व्यापक रणनीतीत डाक मळ्याचे स्थान अधोरेखित करणे.**

International Journal of Research in Social Sciences
Vol. 9 Issue 3, March 2019,
ISSN: 2249-2496 Impact Factor: 7.081
Journal Homepage: http://www.ijmra.us, Email: editorijmie@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal - Included in the International Serial Directories Indexed & Listed at: Ulrich's Periodicals Directory ©, U.S.A., Open J-Gate as well as in Cabell's Directories of Publishing Opportunities, U.S.A

**भूमिगत स्वातंत्र्य चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

**भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात भूमिगत चळवळींचे योगदान निर्णायक मानले जाते. १८५७ च्या उठावानंतर ब्रिटिशांनी भारतीय राष्ट्रवाद्यांवर कडक नियंत्रण ठेवले, निर्बंध लादले. परिणामी, १९व्या शतकाच्या उत्तरार्धात 'अनुशीलन समिती' (१९०२), 'युगांतर गट' (१९०६) आणि 'गदर पार्टी' (१९१३) यांसारख्या गुप्त क्रांतिकारक संघटना उदयास आल्या. या संघटनांनी ब्रिटिश सत्तेला अस्थिर करण्यासाठी बॉम्बस्फोट, राजकीय हत्या आणि हेरगिरी अशा माध्यमांचा वापर केला.**

**प्रथम महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतात जहाल राष्ट्रवादी विचार वाढीस लागले. १९२० च्या दशकात म. गांधीप्रणीत असहकारितेच्या लढ्यातील अनेक कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली, संघटनांवर बंदी घातली गेली. अशा वेळी काही कार्यकर्ते गुप्तपणे कार्यरत राहिले. याचासुमारास हिंदुस्तान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन (HSRA) सारख्या क्रांतिकारी संघटनांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला. भगतसिंग, राजगुरू, बटुकेश्वर दत्त, चंद्रशेखर आझाद यांच्यासारख्या हे या लढ्यात पुढे आले.**

**१९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनाने भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या अखेच्या पर्वाला सुरुवात झाली.[१] महात्मा गांधींनी ब्रिटीश सत्तेविरुद्ध 'चले जाव'ची घोषणा देताच देशाच्या कानाकोपऱ्यात स्वातंत्र्याचे वारे संचारले. त्यांच्या 'करा अथवा मरा' या संदेशामुळे स्वातंत्र्य चळवळ अधिक गतिमान झाली. ब्रिटिशांनी ही चळवळ दडपून टाकण्यासाठी अटकसत्र सुरु केले. म. गांधी यांचेसह इतर अनेक महत्वाच्या नेत्यांना अटक करून स्थानबद्ध करण्यात आले. ज्याची परिणती भूमिगत चळवळीच्या उदयात घडून आली. अल्पावधीतच या चळवळीचा प्रभाव व विस्तार महाराष्ट्रात दिसून आला. विशेषत: सातारा, सांगली व कोल्हापूर भागात भूमिगत चळवळ अधिक तीव्र होती. याच दरम्यान क्रांतिसिंह नाना पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यासोबत सातारा येथे प्रतिसरकारची (पत्रीसरकार) स्थापना केली.[२] ज्यामाध्यमातून ब्रिटीश सरकारचा कोणताही आदेश न पाळता गावाचा स्वतंत्र कारभार चालवला जायचा. ज्यामुळे ब्रिटीश शासनाची यंत्रणा पूर्णपणे खिळखिळी झाली. परिणामी ब्रिटीश शासनाने दडपशाहीचे धोरण स्वीकारून अटकसत्र सुरु केले. या पाश्वभूमीवर कोरे कुटुंबीयांचा वारणा नदीकाठचा 'डागमळा' भूमिगत क्रांतीकारकांचे आश्रयस्थान व भूमिगत स्वातंत्र्य चळवळीतील एक गुप्त केंद्रस्थान ठरले.**

International Journal of Research in Social Sciences
Vol. 9 Issue 3, March 2019,
ISSN: 2249-2496 Impact Factor: 7.081
Journal Homepage: http://www.ijmra.us, Email: editorijmie@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal - Included in the International Serial Directories Indexed & Listed at: Ulrich's Periodicals Directory ©, U.S.A., Open J-Gate as well as in Cabell's Directories of Publishing Opportunities, U.S.A

**डागमळा भूमिगत स्वातंत्र्य चळवळीतील एक गुप्त केंद्रस्थान :**

**भूमिगत चळवळ देशातील इतर भागासह महाराष्ट्रातील तत्कालीन सातारा, सांगली व कोल्हापूर भागात मोठ्याप्रमाणात गतिमान होती. ज्यांतर्गत टेलिग्रामचे खांब, विद्युतखांब व तारा तोडणे, रस्ते, रेल्वेमार्ग व त्यावरील पूल उडवणे, ठिकठिकाणी रस्ते उखडणे, रेल्वेमार्गावरील प्लेट्स काढणे, भूमिगत रेडीओ केंद्र चालविणे, फितुरांना शिक्षा करणे असे कार्यक्रम हाती घेण्यात आले. सातारा येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्त्वाखालील 'प्रतिसरकारची' अथवा 'पत्री सरकारची' कामगिरी यादृष्टीने विशेष उल्लेखनीय होती.**

**भूमिगत चवळीचे कार्य हे संस्थात्मक, संघटनात्मक, रचनात्मक व सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने चालणारे होते. सदरचे कार्य करीत असतांना चवळीतील क्रांतिकारक हे विभिन्न ठिकाणी आश्रय घेत स्वातंत्र्याचा लढा गतिमान करीत होते. ज्यामध्ये डोंगर, द-या, जंगल, उसाचा फड, नैसर्गिक गुहा, पडक्या विहिरी ही प्रमुख आश्रयस्थाने व क्रांती केंद्रे होती. अशाच प्रकारचे एक महत्त्वाचे क्रांती केंद्र म्हणजे 'डागमळा' हा होय.**

**कोडोली (ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर) येथील तात्यासाहेब कोरे यांचा वारणा नदीकाठचा तत्कालीन ६० एकरचा शेतमळा म्हणजेच 'डागमळा' होय. महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा विचारांचा व कार्याचा पगडा असणारा तरुण युवक म्हणजे तात्यासाहेब कोरे हे होय. बालपणी श्रीधरपंत कुलकर्णी यांच्याकडे शिक्षण घेत असतांना त्यांच्या माध्यमातून तात्यासाहेबांना देशाच्या स्वातंत्र्य चळवळीची माहिती मिळाली. पर्यायाने त्यांच्यात राष्ट्रभक्ती व राष्ट्रवाद निर्माण होवून ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. ऑगस्ट १९४२ मध्ये मुंबई येथे गवालिया टंक मैदानावर भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अधिवेशनास तात्यासाहेब कोरे हे के.डी. पाटील व यशवंतराव चव्हाण यांचेसमवेत हजर होते.[3] त्याप्रसंगी ब्रिटीशांकरवी महात्मा गांधी यांचेसह अनेक प्रमुख नेत्यांना अटक करून तुरुंगात डांबण्यात आले. अशाप्रसंगी आपण तुरुंगात अडकून पडणे स्वातंत्र्य चळवळीच्या दृष्टीने हिताचे नाही, त्याऐवजी महात्मा गांधी यांच्या 'करा किंवा मरा' व सरदार पटेल यांच्या 'तुमच्या सदसदविवेकबुद्धीला जे पटेल ते करा; पण ही स्वातंत्र्य चळवळ थांबू देऊ नका. स्वातंत्र्य मिळेपर्यंत अविरत लढा देत झुंझत रहा.' या विधानास अनुसरून या मंडळींनी सातारा, सांगली व कोल्हापूर परिसरात स्वातंत्र्यलढ्याचे भूमिगत कार्य सुरु ठेवले. या भूमिगत कार्यामध्ये 'डागमळया'ची भूमिका महत्वाची होती.**

International Journal of Research in Social Sciences
Vol. 9 Issue 3, March 2019,
ISSN: 2249-2496 Impact Factor: 7.081
Journal Homepage: http://www.ijmra.us, Email: editorijmie@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal - Included in the International Serial Directories Indexed & Listed at: Ulrich's Periodicals Directory ©, U.S.A., Open J-Gate as well as in Cabell's Directories of Publishing Opportunities, U.S.A

**भारतीय स्वातंत्र्य लढ्याने जनआंदोलनाचे रूप धरण केले होते. अशातच एप्रिल १९४२ मध्ये झालेल्या अलाहाबाद काँग्रेसनंतर निर्माण झालेल्या सर्व प्रश्नांचा अन्वयार्थ लावण्यासाठी समविचारी मंडळींनी एकत्र बसून चर्चा करावी तसेच आंदोलनाची दिशा ठरवावी त्यादृष्टीने नियोजन करावे यासाठी यशवंतराव चव्हाण व इतर मंडळीनी कोल्हापूर संस्थानातील कोडोली येथील श्री. विश्वनाथराव कोरे यांच्याकडे जायचे ठरविले. त्याची आठवण सांगतांना यशवंतराव चव्हाण 'कृष्णाकाठ' या त्यांच्या आत्मचरित्रात म्हणतात, "विश्वनाथराव ऊर्फ तात्यासाहेब कोरे हे एक उत्कृष्ट सहकारी कार्यकर्ते म्हणून आज विख्यात आहेत आणि त्यांचा आणि माझा सर्व जन्मभर ऋणानुबंध वाढत गेलेला आहे. त्या वेळी ते व्यापार आणि शेती यांमध्ये लक्ष घालीत होते. त्यांचा 'डागमळा' म्हणून वारणाकाठी अत्यंत उत्तम प्रकारचे उसाचे पीक काढणारा शेतीचा उद्योग होता.**

**आम्ही योजलेली आमची ही बैठक आम्ही त्या डागमळ्यामध्येच घेतली. मला आठवते, के. डी., तात्या कोरे आणि इतर मित्रमंडळी हजर होती. अलाहाबादच्या काँग्रेसचा मला समजलेला अर्थ मी त्यांना स्पष्ट करून सांगितला. आणि या मतभेदांतून एक तर काँग्रेस फुटेल तरी, नाही तर गांधीजी आपल्या इच्छेप्रमाणे जनआंदोलन सुरू करतील, हा माझा कयास मी त्यांना सांगितला. त्यावेळच्या वातावरणाने आम्ही सगळे भारून गेलो असल्यामुळे के.डीं.नी तर त्याच ठिकाणी कबूल केले, की असे आंदोलन होणार असेल, तर तुमच्या बरोबरच आम्हीही आमच्या वकिलीला रामराम ठोकू. तात्यासाहेब कोरे यांची आम्हांला सहानुभूती होती. त्या दिवसाची ती दुपार आणि संध्याकाळ या अनेकविध राजकीय व इतर चचर्चामध्ये रंगल्याची आठवण मला नेहमी होते."[४] वरील वर्णनावरून असे निश्चितपणे म्हणता येईल की, वारणा नदीकाठचा त्यात्यासाहेब कोरे यांचा 'डाग मळा' हा केवळ भूमिगत क्रांतिकारकाचे आश्रयस्थानच नव्हे; तर भूमिगत स्वातंत्र्य चळवळीचे नियोजन, दिशादर्शनाचे प्रत्यक्ष साक्षीदार असलेले एक गुप्त केंद्रस्थान होते.**

**भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात अनेक क्रांतीकारकांना ब्रिटिश सरकारच्या सततच्या पाठलागामुळे सुरक्षित निवाऱ्याची नितांत गरज होती. अशातच भूमिगत चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या क्रांतीकारकांसाठी डाग मळा हे ठिकाण एक विश्वासार्ह आणि सुरक्षित केंद्र बनले होते. ते त्याच्या भौगोलिक वैशिट्यपूर्ण रचना व तात्यासाहेब कोरे यांच्या सहकार्याने होय. हा मळा कोल्हापूर संस्थानात वारणा नदीकाठी वसलेला असून त्याच्या सभोवती ऊसाचे फड होते. त्यामुळे भूमिगत क्रांतिकारकांच्या लपण्यासाठी तो अतिशय उपयुक्त होता. साताऱ्याहून पाठलाग करत आलेल्या पोलिसांना कोल्हापूर संस्थानाच्या हद्दीत प्रवेश करण्यास बराच विलंब होत असे, त्यामुळे**

**डाग मळ्यात लपलेल्यांना क्रांतीकारकांना हालचाल करण्यास वेळ मिळत असे. तात्यासाहेबांनी आपल्या डागमळ्यामध्ये अनेक भूमिगत क्रांतिकारकांना आश्रय दिला होता.[५] यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, के. डी. पाटील हे नेहमी डाग मळ्यावर आश्रयास असत. तसेच २५ ते ३० भूमिगत कार्यकर्ते नेहमी आश्रयास असत.[६] त्या क्रांतिकारकांना पिस्तूले, दारुगोळा, बंदुकी यांचा पुरवठा करण्याचे काम तात्यासाहेब कोरे यांनी बहुमोल सहकार्य केले.[७] डाग मळ्यावर क्रांतिकारकांना आश्रय देणे व शस्त्रास्त्रे पुरविणे यासोबतच त्यांच्या संरक्षणाची संपूर्ण तजवीज करण्यात येत होती. पोलीसांचा छापा पडणार असेल तर त्यापूर्वीच सर्व माहिती डाग मळ्यावर पोहोचाविली जात असे. असाच एकदा डाग मळ्यावर पोलीसांचा छापा पडला असता, संपूर्ण डाग मळ्याची त्यांनी कसून तपासणी केली; मात्र तेथे पोलीसांच्या हाती एकही क्रांतिकारक लागला नाही.[८] एकंदरीत काय तर 'डागमळा' भूमिगत स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिकारक व क्रांतिकार्यासाठी सुरक्षित गुप्त केंद्रस्थान होते.**

**निष्कर्ष :**

**१९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशात भूमिगत चळवळीचे व्यापक जाळे निर्माण झाले. या चळवळीचे एक महत्त्वाचे गुप्त केंद्र म्हणजे 'डाग मळा' होते. कोल्हापूर आणि सातारा संस्थानांच्या सीमेवर वसलेला डाग मळा याला भौगोलिकदृष्ट्या विशिष्ट स्थान प्राप्त झाले होते. इंग्रज सत्तेपासून लपण्यासाठी, संपर्क साखळ्या निर्माण करण्यासाठी आणि सुरक्षित नियोजनासाठी डाग मळा हे क्रांतीकारकांचे आधारस्थान होते. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, के. डी. पाटील यांचेसह २५ ते ३० भूमिगत कार्यकर्ते नेहमी डाग मळ्यावर आश्रयास असायचे. तेथील ऊसाच्या फडांमुळे लपण्यासाठी योग्य परिसर, स्थानिक कोरे कुटुंबांचे सहकार्य आणि क्रांतिकारक विचारांचा प्रसार हे घटक भूमिगत कार्यासाठी पोषक ठरले. डाग मळ्याच्या माध्यमातून केवळ सुरक्षित आश्रयच नव्हे, तर शस्त्रास्त्र, संदेशवहन, निधी व्यवस्था आणि योजना आखण्याचे कार्यही पार पाडले गेल्याचे दिसून येते. त्यामुळेच १९४२ नंतरच्या भूमिगत चळवळीला चालना देणाऱ्या प्रमुख गुप्त केंद्रांमध्ये डाग मळ्याचे स्थान विशेषत्वाने अधोरेखित होते. ब्रिटिश सत्तेच्या पारंपरिक अन्वेषण पद्धतीपासून सुटून गुप्त मार्गांनी लढा चालू ठेवण्याचे हे ठिकाण म्हणजे भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासातील एक वारसा स्थळ असल्याचे सिद्ध होते.**

International Journal of Research in Social Sciences
Vol. 9 Issue 3, March 2019,
ISSN: 2249-2496 Impact Factor: 7.081
Journal Homepage: http://www.ijmra.us, Email: editorijmie@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal - Included in the International Serial Directories Indexed & Listed at: Ulrich's Periodicals Directory ©, U.S.A., Open J-Gate as well as in Cabell's Directories of Publishing Opportunities, U.S.A

**संदर्भ :**


१. केतकर कुमार, कथा स्वातंत्र्याची, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ व अभ्यास संशोधन मंडळ, पुणे, २०१०, पृ. २४९

२. पाटणकर भारत, महाराष्ट्राचे शिल्पकार नाना पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संकृती मंडळ, मुंबई, २००२, पृ. २३

३. कोरे तात्यासाहेब (आत्मनिवेदन), दातार मुकुंद (शब्दांकन), मी : एक कार्यकर्ता, जन्मशताब्दी वर्ष: पुर्नरमुद्रित आवृत्ती, कोल्हापूर, २०१४, पृ. ९६

४. चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र, खंड पहिला, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, १९८४, पृ. २४३-२४४

५. मा. श्री. वि. आ. तथा तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव स्मरणिका, पृ. ०३

६. कोरे तात्यासाहेब, उपरोक्त, पृ. १००

७. कित्ता, पृ. ९९

८. कित्ता, पृ. १००